# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## तक्रार क्रं. ग्रागानिमं/नाशप/०३४ /२०१०

अर्जदार : श्री वामन शंकरराव निबांळकर
राहणार प्लॉट नं. १४, सन्मार्ग नगर,
हुडकेश्वर रोड,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : १) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

२) श्रीमती के.के घरत
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

३) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

– आदेश पारित दि. ३१.०५.२०१० --

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक १५.०४.२०१० रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१ दिनांक ०३.११..२००९ रोजी अर्जदार श्री. वामन शंकरराव निंबाळकर यांनी उपकार्यकारी अभियंता, म.रा.विद्युत वितरण कं. मर्या. नंदनवन उपविभाग येथे नविन विद्युत जोडणीसाठी अर्ज केला आहे. सदर ठिकाणी त्यांच्या किरायेदाराने वापरलेल्या विद्युत देयकाची थकबाकी आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने नविन विद्युत जोडणी देण्याचे नाकारले. त्यामुळे सदर अर्जदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, नागपूर शहर प्रविभाग येथे तक्रार केली. अं.ग्रा.त.नि.कक्ष यांनी अर्जदाराचे म्हणणे नाकारले म्हणून सदर अर्जदाराने दिनांक १५.४.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले. तसेच किरायेदाराकडे असलेली थकबाकी त्यांच्याकडूनच वसूल करुन अर्जदारास त्या जागेवर नविन विद्युत जोडणी देण्यात यावी. अशी मदतीची मागणी केली आहे.

२ दिनांक ०६.०५.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली दोन्ही पक्ष उपस्थित होते. तक्रारकर्त्याने सदर याचिकेत असे स्पष्ट केले आहे की तक्रार कर्त्याची परवानगी न घेता त्याचे जुने किरायेदार श्री नंदकिशोर काळे यांना विद्युत पुरवठा देण्यात आला होता. त्या कनेक्शनवर विद्युत बिलाची थकबाकी असल्यामुळे विद्युत पुरवठा कायमचा खंडीत करण्यात आला, हि बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे.. तक्रारकर्त्याने सदर जागा न्यायालयाच्या आदेशानुसार रिकामी करून घेतली. त्यावेळी किरायेदाराने मिटर काढुन नेले व त्यामुळे सदर मिटरवरील थकबाकीशी तक्रार कर्त्याचा काहीही संबध नाही तेव्हा तक्रारकर्त्यास नविन विद्युत पुरवठा देण्यात यावा.

३. गैरअर्जदाराने तक्रारकर्त्यास दिलेल्या उत्तराची प्रत सदर गा–हाण्यात उत्तर म्हणुन दाखल केलेली आहे. गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तक्रारकर्त्याचे किरायेदारास दिलेले मिटर हया कार्यालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन सदर मिटरची थकबाकी भरल्याशिवाय नविन मिटर देता येणार नाही. तसेच गैरअर्जदारास हेही मान्य आहे की तक्रार कर्त्याने श्री काळे यांचे कडुन सदर दुकान न्यायालयाच्या आदेशान्वये रिकामे करून घेतले.

परंतू अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, त्यांनी गैरअर्जदारास, किरायेदाराचा नागपूरातील सध्या वास्तव्य असलेल्या जागेचा पत्ता दिलेला आहे व त्यांच्याकडून थकबाकी वसूल करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच

वरीलबाबींवर गैरअर्जदाराकडून कुठलीही कार्यवाही झाली नाही, असे तक्रारकर्त्याने त्याच्या निवेदनात म्हटले आहे.

४. तक्रारकर्त्याने पुढे असे नमूद केले की, श्री नंदकिशोर काळे हे किरायेदार होते. व त्यांनी ग्राहक क्रं. ४१००१४९३४९०५ असलेले विद्युत कनेक्शन घेतले होते. नविन विद्युत पुरवठा व मिटर देतांना किंवा दुकान रिकामे करून घेतांना तक्रारकर्त्याचा त्या जागी असलेल्या विद्युत जोडणीशी काहीही संबंध नव्हता. तसेच नविन विद्युत पुरवठा देतांना तक्रार कर्त्याचे ना हरकत पत्र घेतलेले नव्हते, अशा परिस्थितीत तक्रारकर्त्याची किरायेदाराचे विद्युत बिलाची थकबाकी देण्याची जबाबदारी राहत नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

५. मंचाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले तसेच सादर केलेल्या कागदपत्राचे निट अवलोकन केले असता मंचाचे असे मत आहे की, सदर किरायेदार हयांचे अजूनही नागपूर शहरात वास्तव्य असल्याने त्या पत्त्यावर पत्रव्यवहार करुन सदर किरायेदाराकडून संबंधीत थकबाकी वसूल करण्याचे सर्व अधिकार गैरअर्जदाराकडे सुरक्षित आहेत. त्यामुळे सदर अर्जदाराकडून थकबाकी वसुल करण्याचा प्रश्नच उठ्भवत नाही त्यामुळे अर्जदारास नियमाप्रमाणे नविन विद्युत जोडणी देण्यात यावी.

दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकुण, रेकार्डवरील कागदपत्राचा विचार केल्यावर सदर याचिकेत खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अर्जदाराचा सदर अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

गैरअर्जदारास आदेश देण्यात येत आहे की तक्रारकर्त्यास नविन विद्युत पुरवठा सर्व औपचारीकता पूर्ण केल्यावर त्वरीत देण्यात यावा.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे कि, कार्यवाही बददलचा अहवाल या कार्यालयास दिनांक ३०.०६.२०१० पर्यंत सादर करण्यांत यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |